# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन:०७१३२-२१६५९४, २२३१०४ फॅक्स: ०७१३२-२२२६५१ Email:arcollegesectiongug48@gmail.com

web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org

क्रमांक/महा.वि./ गो.वि./ ५२७ /२०१५ दिनांक १ ... , २०१५

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजुर करणे व रिक्त पदे भरण्याबाबत

सदर्भ:— १)उशिनाग/पदमा/कायमविअनु/३९४८/१४ दि. ११/७/२०१४
२) जा.क्र./महा.वि/गो.वि./१७४/२०१४ दि. २८ जूलै, २०१४

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांच्या सोबतच्या परिपत्रकानुसार कायम विनाअनुदानित महाविद्यालयानी कार्यवाही करण्याकरिता सूचना देण्यात आलेले होते.

मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांच्याकडून कायम विनाअनूदानित महाविद्यालयांनी कार्यभार मंजूर करून घेणे आवश्यक आहे. जे कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यभार निश्चित करण्याबाबत टाळाटाळ करतील अशा महाविद्यालयांना विद्यापीठ कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.

कळावे,

सहपत्रे:—वरिलप्रमाणे

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुनी मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर
Website: dirhe.org.in/jdnagpur/ Email: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712 2554210 Fax No.0712 2561713

अति महत्वाचे/तात्काळ

क्रमांक :- उशिनाग/पदमा/कायमविअनु/३८४८/१४
दिनांक :- ११/०७/२०१४

प्रति,

१) डॉ श्रीकांत कोमावार
संचालक, (म.वि.वि.मं.)
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

२) संचालक,
म.वि.वि.मं,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:-** कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार मंजुर करणे व रिक्त पदे भरण्याबाबत.

**संदर्भ:-** १) आपले पत्र क्र. म.वि.४५६६/सी/५७०४, दिनांक २४/६/२०१४.
२) यापूर्वीचे या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/पदमा/कायमविअनु/२५८९/१४, दिनांक १५/०५/२०१४.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/पदमा/कायमविअनु/३२७०/१४,दिनांक ७/०६/२०१४.

......

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रान्वये शासन मान्यता प्राप्त कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा कार्यभार निश्चितीकरण करण्याबाबत मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), म.रा.पुणे हयांनी या कार्यालयास निर्देश दिल्यानंतर या कार्यालयाचे दिनांक १५/०५/२०१४ व ७/०६/२०१४ चे पत्रान्वये सदर कार्य तातडीने करण्याचे दृष्टीकोणातून या विभागांतर्गत असलेल्या कायम विनाअनुदानित महाविद्यालयाची यादी विद्याशाखा नमूद करून महाविद्यालयाचे पत्त्यासह तसेच दुरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी सह तसेच सदर महाविद्यालयात अस्तित्वात असलेल्या विद्याशाखेच्या अंतर्गत असलेल्या विषयाचा कार्यभाराकरीता विद्यापीठाने ठरवून दिलेल्या निकषाची प्रत तात्काळ कार्यालयास उपलब्ध करून घ्यावी असे आपणास यापूर्वी कळविले असता आपण अद्यापही यादी या कार्यालयास सादर केलेली नाही. त्यामुळे कामात विलंब होत आहे.

सदर पदमान्यतेकरीता प्रामुख्याने विद्यार्थी संख्या प्रमाणित असणे आवश्यक आहे. तेव्हा कायम विना अनुदानित महाविद्यालयांची प्रवेशित विद्यार्थीसंख्या विद्यापीठातील परीक्षा नियंत्रक अधिका-याकडून प्रमाणित केलेली असणे आवश्यक आहे. तेव्हा नागपूर विभागातील कायम विना अनुदानित महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्येची माहिती विद्यापीठाकडून प्रमाणित केलेली यादी या कार्यालयास तातडीने सादर करावी त्याअभावी सदर महाविद्यालयांची पदमान्यता करणे शक्य होणार नाही.

त्याचप्रमाणे यासोबत कायम विनाअनुदानित महाविद्यालयास पदमान्यतेच्या प्रस्तावासोबत सादर करतांना कोणती कागदपत्रे आवश्यक आहे त्याबाबतचे सहपत्र सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित महाविद्यालयास पदमान्यता प्रस्ताव सादर करण्याकरीता आपले स्तरावरून कळविण्यात यावे.

**सहपत्र:-** वरीलप्रमाणे

**सहसंचालक उच्च शिक्षण,**
**नागपूर विभाग,नागपूर**

**प्रत:-** १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), म.रा. पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) सहा. कुलसचिव, महाविद्यालयीन शाखा, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी सदर बाबीस प्राधान्य देवून तात्काळ कार्यवाहीस्तव अग्रेषित.